**शिक्षण हक्क कायदयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मधील उच्च प्राथमिक शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांची नियुक्ती करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन

### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

### शासन निर्णय क्रमांकः एसएसए-२०१४/प्र.क्र.६०/टीएनटी-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २१ ऑगस्ट, २०१४

**संदर्भ -**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक पीआरई-२०१०/प्र.क्र.२१७/प्राशि-१, दिनांक १८ जून, २०१०

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक -पीआरई-२०११/प्र.क्र.२७५/प्राशि-१, दिनांक ७ डिसेंबर, २०११

**प्रस्तावना -**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १९ आणि अधिनियमाचे परिशिष्ट "अ" प्रमाणे ज्या उच्च प्राथमिक शाळेची पटसंख्या १०० पेक्षा जास्त आहे अशा शाळेमध्ये कला शिक्षण, शारिरीक शिक्षण व आरोग्य आणि कार्य शिक्षण (कार्यानुभव) या विषयाचे अध्यापन करण्यासाठी अंशकालीन निदेशकाची नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. यासंदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने देखील धोरण ठरविण्याबाबतचे आदेश शासनास दिलेले आहेत. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये (जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका) अंशकालीन निदेशकांची पदे नियुक्त करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

राज्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या ज्या उच्च प्राथमिक शाळांची (इ. ६ वी ते ८ वी वर्गातील) पटसंख्या १०० पेक्षा जास्त

आहे, अशा सोबत जोडलेल्या परिशिष्ट “अ” मध्ये जिल्हानिहाय संख्या दर्शविल्याप्रमाणे ३० सप्टेंबर, २०१३ च्या UDISE Data नुसार १८३५ शाळांमध्ये कला शिक्षण, शारिरीक शिक्षण व आरोग्य आणि कार्य शिक्षण (कार्यानुभव) या विषयांचे अध्यापन करण्यासाठी प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र याप्रमाणे ५५०५ अंशकालीन निदेशकांची पदे निर्माण करण्यास आणि कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. अंशकालीन निदेशकांच्या पदावर नियुक्त होण्यासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व व्यावसायिक पात्रता निश्चित करण्यात येत आहे.

**अ) कला शिक्षण :-**

१) ए.टी.डी./बी.एफ.ए./ए.एम. ही व्यावसायिक पात्रता

अथवा

२) नृत्य, गायन किंवा वादन विषयातील गंधर्व महाविदयालयाची किंवा मान्यताप्राप्त विदयापीठाची विशारद पदवी अथवा समकक्ष अर्हता.

**ब) शारीरीक शिक्षण व आरोग्य :-**

१) कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील पदवी किंवा समकक्ष शैक्षणिक अर्हता आणि

२) बी.पी.एड/ बी.एड. फिजीकल अथवा समकक्ष व्यावसायिक पात्रता

**क) कार्य शिक्षण (कार्यानुभव) :-**

१) कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील पदवी किंवा समकक्ष शैक्षणिक अर्हता आणि

२) हस्तकला, व कार्यानुभव शिक्षण प्रमाणपत्र (Teacher in Handicraft & Work Experience) ही व्यावसायिक पात्रता.

**३.** अंशकालीन निदेशक पदावर नियुक्ती देण्यात येणाऱ्या उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे व कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे राहील. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे राहील. तसेच शासनाने विहित केलेले आरक्षण सदर पद भरतीस लागू राहील.

**४.** सर्व शिक्षा अभियानांतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात भारत सरकारने मंजूर केलेल्या तरतूदीच्या मर्यादेत अंशकालीन निदेशकांना प्रति तासिका रु. ५०/- याप्रमाणे दरमहा रुपये ५००० हजार या कमाल मर्यादेत मानधन अनुज्ञेय राहील. सदर पदावरील नियुक्त्या कंत्राटी तत्वावरील निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या सदर विषयांचा कार्यभार विचारात घेऊन घड्याळी तत्वावर असल्याने त्यावरील नियुक्त उमेदवारांना सेवेत कायम करण्याचा व नियमित सेवेचा कोणताही लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**५.** अंशकालीन निदेशकांची नियुक्ती करण्यासाठी खालीलप्रमाणे निवड समितीची स्थापना करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

अ) जिल्हा स्तर निवड समिती

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - उपाध्यक्ष |
| ३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , जिल्हा परिषद | - सदस्य |
| ४. महानगरपालिका उपायुक्त / प्रशासन अधिकारी | - सदस्य |
| ५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद | - सदस्य सचिव |

ब) बृहन्मुंबई महानगरपालिका स्तर निवड समिती -

| | |
|---|---|
| १. अतिरिक्त आयुक्त (शिक्षण) | - अध्यक्ष |
| २. उपायुक्त (शिक्षण) | - उपाध्यक्ष |
| ३. विभागीय शिक्षण उप संचालक | - सदस्य |
| ४. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई | - सदस्य सचिव |

६. अंशकालीन निदेशकांची पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे :-

१) अंशकालीन निदेशकांची पदे भरण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात जिल्हास्तरावरुन माध्यमनिहाय, पदनिहाय, आरक्षण निहाय पदे विचारात घेऊन जाहिरात देण्यात यावी.

२) जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांची छाननी, वय, शैक्षणिक अर्हता व व्यावसायिक पात्रतेप्रमाणे करण्यात यावी.

३) छाननीमध्ये पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे घेतील. ही परिक्षा १०० गुणांची राहील त्यात सामान्य ज्ञान, कला, क्रीडा, शालेय आरोग्य, कार्यानुभव, इंग्रजी, गणित या विषयांचा अंतर्भाव असेल.

४) यापूर्वी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या अंशकालीन निदेशकानांसुध्दा पात्रतेच्या अधीन राहून परीक्षा देता येणार असून, परीक्षेत प्राप्त गुणांवर त्यांच्या यापूर्वीच्या अंशकालीन निदेशकांच्या अनुभवासाठी खालीलप्रमाणे भारांकन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंशकालीन निदेशक म्हणून काम केल्याचा कालावधी | भारांकन |
|---|---|---|
| १ | १८० दिवसांपर्यत | ०१ |
| २ | १८१ ते २७० दिवसांपर्यंत | ०२ |
| ३ | २७१ ते ३६५ दिवसांपर्यंत | ०३ |
| ४ | ३६६ ते ४५० दिवसांपर्यत | ०४ |
| ५ | ४५१ ते ५४० दिवसांपर्यत | ०५ |
| ६ | ५४१ ते ६३० दिवसांपर्यत | ०६ |
| ७ | ६३१ ते ७२० दिवसांपर्यत | ०७ |

५) लेखी परीक्षेत प्राप्त गुणांचा विचार करुन पद निहाय, संवर्ग निहाय व माध्यम निहाय गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी व त्यानुसार गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात यावी.

६) जिल्हास्तर निवड समित्यांना तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका स्तर निवड समितीस महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेमार्फत लेखी परीक्षा घेण्याचा पर्याय उपलब्ध राहील.

७) सदर नियुक्तीचा कालावधी शैक्षणिक सत्रापुरता मर्यादित राहील. अंशकालीन निदेशकांना काम समाधानकारक असल्यास नविन शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतर पुनर्नियुक्ती देण्यात येईल.

८) एखादया उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्गाची पटसंख्या १०० पेक्षा कमी झाल्यास अंशकालीन निदेशकाच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.

९) अंशकालीन निदेशकांची नियुक्ती पारदर्शक पध्दतीने व विहीत कालावधीत करण्यात यावी. यासंदर्भात काही तक्रार उद्भवल्यास त्याचे निराकरण निवड समितीने करावे.

१०) सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत लागू राहील. मात्र त्यानंतर पुनर्विलोकनानंतर ही योजना पुढे चालू ठेवण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

७. राज्यातील जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या आणि १०० पेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या १८३५ उच्च प्राथमिक शाळांमध्ये नियुक्त करावयाच्या ५५०५ अंशकालीन निदेशकांच्या मानधनासाठी येणारा खर्च केंद्र पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान या योजनेमधून भागविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय नियोजन आणि वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे २४२/१४०१, दिनांक ११/०६/२०१४ आणि ४४४/व्यय-५, दिनांक २५/०७/२०१४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८२११७२०५३२७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Phadke Milind K

Digitally signed by Phadke Milind K
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Phadke Milind K
Date: 2014.08.22 15:15:08 +05'30'

**(मि.का.फडके)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ( सर्व )

४. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य विधान भवन, मुंबई (सर्व)

५. मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक

६. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

९. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

१०. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई

१३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

१४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

१५. शिक्षण संचालक (निरंतर शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

१६. संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे

१७. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

१८. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे

१९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

२०. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

२१. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक/निरंतर), जिल्हा परिषद (सर्व)

२२. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगर परिषद (सर्व)

२३. निवड नस्ती, (कार्यासन -टिएनटी -१)

## परिशिष्ठ "अ"

| अ.क्र. | जिल्हयांचे नाव | शाळांची संख्या |
|---|---|---|
| १ | अहमदनगर | ३६ |
| २ | अकोला | ३१ |
| ३ | अमरावती | ४४ |
| ४ | औरंगाबाद | १२४ |
| ५ | भंडारा | ६ |
| ६ | बीड | २७ |
| ७ | बुलढाणा | ५८ |
| ८ | चंद्रपूर | २० |
| ९ | गडचिरोली | २ |
| १० | गोंदिया | १९ |
| ११ | हिंगोली | ४० |
| १२ | जळगांव | ४९ |
| १३ | जालना | ४४ |
| १४ | कोल्हापूर | ६५ |
| १५ | लातूर | २० |
| १६ | नागपूर | २३ |
| १७ | नांदेड | ५६ |
| १८ | नंदुरबार | १० |
| १९ | धुळे | ३ |
| २० | नाशिक | १०९ |
| २१ | उस्मानाबाद | २५ |
| २२ | परभणी | ३५ |
| २३ | पुणे | २१७ |
| २४ | रायगड | २२ |
| २५ | रत्नागिरी | १६ |
| २६ | सांगली | १५ |
| २७ | सातारा | २० |
| २८ | सिंधुदुर्ग | १ |
| २९ | सोलापूर | ५४ |
| ३० | ठाणे | २५९ |
| ३१ | वाशिम | ११ |
| ३२ | यवतमाळ | ४५ |
| ३३ | बृहन्मुंबई | ३२९ |
|  | एकूण | १८३५ |